**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा शपथेवर जबाब**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवदेन करतो कीः

माझे नांवः– प्रथमेश विजय टोपले

वयः–२६ वर्षे, धंदाः– हॉटेल काम,

राहणारः– वैश्यवाडा, सावंतवाडी , जि. सिंधुदुर्ग.

**सरतपास विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. एस. पाटील यांचेतर्फे**

१. दि. २४/०२/२०२३ रोजी पोलीसांनी वेंगुर्ला बस स्टॅण्ड येथे बोलावले होते. तेथे जुगाराची आकडेमोड करत होते. त्यासाठी मला पंच म्हणून बोलावले होते. माझ्या सोबत दुसरे भुषण नाईक हजर होते. त्यानंतर बस स्टॅण्डच्या बाजूला टपरी आहेत त्याच्या बाजूला गेलो. तेथे एक इसम कागदावर आकडेमोड करत असताना दिसला. पोलीसांनी त्याला त्याचे नांव गांव विचारले असता त्याने त्याचे नांव सागर राजन मठकर असे सांगितले. पोलीसांनी माझे समक्ष वस्तू म्हणजेच पेन, ३०० ते ४०० पर्यंत लिहीलेल्या पावत्या, त्या माझ्या समक्ष जप्त केल्या. पैसे जप्त केले. मी ते सर्व वाचले त्यावर माझी सही घेतली. मला घटनास्थळ पंचनामा दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता साक्षीदारास पंचनाता दाखविण्यात आला. त्यावर अ.क्र.१ वर सही आहे. अ.क्र.२ ला भूषण नाईक यांची सही आहे. ती ओळखण्याचे कारण म्हणजे त्याने माझ्या समक्ष केलेली आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.११** देण्यात आली. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर नाही. मी मुद्देमाल पाहिल्यास ओळखू शकतो.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. डी. के. गांवकर यांचे मार्फत–**

२. मला स्टॉलवर एकटाच इसम दिसला. हे म्हणणे खरे आहे की, तेथे मटका देताना व घेताना कोणी दिसले नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या आकड्यावर किती पैसे लावले हे मला माहित नाही. माझ्या समक्ष आकडे लिहीलेले नाहीत. तेथे पाचशेच्या चार नोटा, शंभरच्या नऊ नोटा व वीस रुपयाची एक व दहा रुपयाची एक अशा नोटा होत्या. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या नोटा किती नंबरसाठी होत्या हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या समक्ष पंचनामा केला हे खोटे सांगत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.08.12 11:19:51 +0530

(श्रीमती आर.जी.कुंभार)

दि.११/०८/२०२५

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

सावंतवाडी.